**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १२ क

## 'स्वामींनी 'चुडामणी' नावाचे रत्न साक्षात केले'

मुलांबरोबर बोलता बोलता स्वामींनी एकदम 'चुडामणी' नावाचे रत्न साक्षात केलं. चुडामणी हा खास दागिना स्त्रिया त्यांच्या डोक्यावर धारण करतात. (अनिल कुमारांनी त्यांच्या डोक्याकडे हात दाखवण्याचा अभिनय केला) हा दागिना सीतेने घातला होता.

अंजनेय सीतेच्या शोधासाठी निघाला होता. सीतेला अंजनेय भेटल्याचा पुरावा म्हणून सीतेने तो चुडामणी अंजनेयाकडे दिला. अंजनेय आणि सीतेची भेट झाली यावर विश्वास कसा बसणार? ते सिद्ध करण्यासाठी सीतेने स्वत: धारण केलेला चुडामणी हा दागिना अंजनेयाला दिला होता. तो फारच सुंदर असा रत्नजडित अलंकार होता. स्वामींनी तो सर्वांना दाखवला आणि म्हणाले, ''हाच दागिना सीतेने तिच्या मस्तकावर धारण केला होता.''

सगळेजण आश्चर्यचकित होऊन त्या दागिन्याकडे पाहत राहिले.

## 'स्वामींनी, मला माहीत नसलेले, एक फळ साक्षात केलं'

त्या दिवशी कुलवंत हॉलमधील व्यासपीठावर स्वामींची खुर्ची दोन सिंहांच्या मधोमध होती. त्यांच्या डावीकडे उपकुलगुरू, तसेच नोंदणी करणारे अधिकारी आणि परीक्षांवर नियंत्रण ठेवणारे अधिकारी, तसेच काही मोठ्या व्यक्ती बसल्या होत्या. त्यांच्या समवेत नागार्जुन बिल्डर्स नावाच्या कंपनीत काम करणारा राजू नावाचा बांधकाम व्यावसायिक आणि मोठा उद्योजक बसला होता.

स्वामी प्रत्येकाशी बोलत होते आणि अचानक त्यांनी हस्तसंचालन करून एक फळ साक्षात केलं. त्याचा आकार - अट्टा पांडू, काहीसं रानटी अंजीरासारखा किंवा बेरीसारखा होता. मी एक वनस्पतीशास्त्राचा विद्यार्थी, पण मला हे सांगायला खूप लाज वाटते, की ते फळ कोणते ते मी सांगू शकलो नाही.

स्वामींनी मला विचारलं, ''हे फळ कोणतं आहे?''

''मला माहीत नाही, स्वामी.''

स्वामी म्हणाले, ''तू एक वनस्पतीशास्त्रज्ञ आहेस- तुला माहीत नाही?''

''मला माहीत नाही, स्वामी.''

त्यावर ते म्हणाले, ''ते इथे वाढत नाही, ते इथे मिळू शकत नाही, मग तुला ते कसं माहीत असणार? हे दुसऱ्या कुठून तरी आणलेलं आहे.''

छान! पण इथेच वाढणारं फळ मी ओळखू शकलो नाही तर काय? माझ्या प्रतिष्ठेचं काय होणार? आणि ते देखील ह्या विद्यार्थ्यांपुढे? (हशा) माझी फारच नामुष्की होईल. पण काही असो, जर ते फळ इथे मिळू शकत नसेल, आणि एखाद्या ठिकाणचे असेल किंवा अगदी दूरवरून, हिमालयातून आणले असेल तर मला त्याची काय माहिती असणार? मी कसा अंदाज करणार? - स्वामींनी ते सर्वांना पाहावयास सांगितले.

ते फळ हातात धरून त्यांनी त्याचे दोन भाग केले. एक भाग त्यांनी राजूला दिला, मला वाटत होतं की दुसरा भाग माझ्याकरता असावा. (हशा) पण तसं घडलं नाही. त्यांनी दुसरा भाग उपकुलगुरूंना दिला. स्वामींनी

त्या दोघांनाही ते तिथेच खाण्यास सांगितले. ते त्यांनी खाल्ले.

राजू, उद्योजक, म्हणाले, ''स्वामी.''

''राजू, फळ कसं आहे?''

''स्वामी, भारतामधील असलेल्या पुष्कळ यात्रा स्थळांना मी भेटी दिल्या आहेत. भारतात मिळणारी अनेक फळं मी खालेल्ली आहेत. मी अशा प्रकारचं फळ पाहिलेलं नाही. त्याची गोडी मी वर्णन करू शकत नाही.''

तो त्याचं वर्णन करण्याचा प्रयत्न करू लागला. ''ते इथे देठापासून गोड आहे.''

त्यानं त्या गोडीचं खोलवर वर्णन करणं चालू ठेवलं.

''अहा, अहा, किती खोलवर ही गोडी शिरली आहे, खूपच गोड, खूपच मधूर,'' तो म्हणाला.

नंतर स्वामी म्हणाले, ''हे फळ तुम्हाला कुठेच मिळणार नाही. मला फक्त तुम्हाला ते दाखवायचं होतं.''

''परमेश्वर त्यानं निवडलेल्या मार्गानेच आपले देवत्व प्रकट करतो.''

नंतर भगवान मागे वळले आणि एका घटनेची माहिती सांगू लागले. हेमीरेड्डी मालम्मा नावाची एक महान महिला भक्त होती. एका वेडसर माणसाशी तिचा विवाह झाला होता. खूप लोकांना तिचा पती वेडाच वाटत असे. पण खरं सांगायचं तर तो प्रत्यक्ष शिवच होता आणि हेमीरेड्डी मालम्मा ही पार्वती होती. प्रत्यक्ष ते दोघे 'देव'च होते. पण ते पृथ्वीवर मानवी अवतारात अवतरले होते. प्रत्येकाला त्या बाईचा नवरा वेडसर आणि माथेफिरू वाटत असे. पण ते स्वत: भगवान शंकरच होते.

कोणत्याही सासूप्रमाणे मालम्माची सासू तिचा छळ करीत असे. एक दिवस तिला १५ पोती मका दळून हवा होता. १५ पोती! तो मका जात्यावर दळून दुसऱ्या दिवशी सकाळी तयार हवा होता. अशा वेळी ती बाई काय करू शकणार होती?

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा सासू आत आली तेव्हा तो १५ पोती मका दळून ठेवलेला पाहून ती आश्चर्याने थक्क झाली. हे का आणि कसं झालं? त्याचं कारण म्हणजे मालम्माचा वेडसर पती, जो खरोखर भगवान शिवशंकरच होता.

भगवान म्हणाले, ''परमेश्वर त्याने स्वत: निवडलेल्या मार्गानेच देवत्व प्रकट करतो. त्याला पाहिजे त्या मार्गानेच. ज्याला तुम्ही वेडा समजत होता, तो खरं म्हणजे स्वत: परमात्माच होता. परमेश्वर जो अवतार घेतो, तो असा.''

## भगवान एका काव्यात्मक शैलीत.

बांधकाम व्यावसायिक राजू हा लेखकही आहे. परमेश्वर सुद्धा एक कवी आहे हे तुम्हाला कळावं म्हणून भगवानांनी काव्यात्मक शैलीत बोलायला सुरूवात केली. ते म्हणाले, ''तूच फक्त नाहीस, मीसुद्धा एक कवी आहे.''

मग ते म्हणाले, ''खेडेगावाची रचना म्हणजे काय असते? गावाची रचना म्हणजे तिथे बांधलेल्या घरांचा समूह.'' कवी असल्याने स्वामींनी 'ग्राम आणि गृह' असे खास शब्द निवडले. म्हणून गृह किंवा घर ही गावाची-ग्रामाची-सजावट असते. त्यांची कविता उपमा आणि रूपकांनी भरलेली होती.

पुढे ते म्हणाले, ''सौंदर्य म्हणजे काय? सागराचे सौंदर्य कुठे पहुडलेले असते? सागराचे सौंदर्य त्याच्या पृष्ठभागावर उफाळणाऱ्या लाटांवर असते. आकाशाचे सौंदर्य कुठे असते? आकाशातील चमचमणारे तारे, तारका आकाशाचे सौंदर्य वाढवतात. मोराचा नखरा कशात असतो? मोराचा पिसारा त्याचे सौंदर्य वाढवतो.''

स्वामींनी एक काव्यरचना करून अशा रीतीने स्पष्ट करण्यास सुरूवात केली.

राजू उठला आणि स्वामींच्या पाया पडला, ‘‘स्वामी, तुम्ही केवढे मोठे कवी आहात!’’

‘‘ओह, ते ठीक आहे. तू खाली बस.’’ (हशा)

ते त्याचं देवत्व स्पष्ट करून दाखवतात. ते जेव्हा डॉक्टरांमध्ये असतात, तेव्हा ते डॉक्टरांचे डॉक्टर असतात. जेव्हा ते लेखक आणि  बुद्धीवंताच्या सान्निध्यात असतात, तेव्हा ते लेखक आणि प्रज्ञावंत असतात. त्यांच्या सभोवती अभियंते असतात, तेव्हा ते अभियंत्यांचे अभियंते असतात. ते म्हणजे निरनिराळे पैलू असणारा हिरा आहेत.

## आजारी माणूस उत्तम स्थितीत आहे.

आणि त्यांनी एकाएकी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या डॉक्टरकडे पाहिलं आणि विचारलं, ‘‘डॉक्टर, ह्या रोग्याला काय झालं आहे?’’

डॉक्टर म्हणाले, ‘‘स्वामी, तो चांगला आहे.’’

खरंच, मी त्या केसाविषयी तपशील ऐकण्यासाठी उत्सुक होतो. ‘‘स्वामी, ह्या केसबद्दल कुतुहल का बरं आहे? जरा सर्वांना ऐकू द्या.’’

मग स्वामी म्हणाले, ‘‘हा आजारी माणूस हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. त्याला हृदयाचा त्रास होता आणि फुप्फुसे निकामी झाली होती. त्याशिवाय तो कर्करोगाने– पोटाच्या कर्करोगाने आजारी होता. ह्या रोग्याला बाकीच्या डॉक्टरांनी दाखल करून घेण्यास नकार दाखवला होता.’’

खरोखरच, अशी जोखीम कोण घेणार? आपले डॉक्टरही म्हणाले, ‘‘स्वामी, हा पेशंट जगणार नाहीये. आपण त्याला घरी जायला सांगू आणि त्याला घरीच शांतपणे मरण येऊ द्या.’’

स्वामी म्हणाले, ‘‘तसं काही करायचं नाही. त्याला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये दाखल करून घ्या आणि चांगले औषधोपचार चालू करा.’’

डॉक्टरांकडे दुसरा पर्याय नव्हता. त्यांना रोग्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. शस्त्रक्रियेला आठ तास लागले. शस्त्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वामी स्वत: तेथेच बसून होते. स्वामींनी त्याच दिवशी संध्याकाळी त्या पेशंटची चौकशी केली.

डॉक्टर म्हणाले, ‘‘स्वामी, तो पेशंट आता छान आहे.’’

अशी ही एका सुधारलेल्या पेशंटची गोष्ट आहे, ज्याच्याबद्दल डॉक्टरांनी पूर्ण आशा सोडली होती.

हा भगवान बाबांच्या अदृश्य हाताचा परिणाम होता. नंतर स्वामींनी जे विधान केलं ते आपण सर्वांनी लक्षात ठेवलं पाहिजे. ‘‘जिथे जिथे परमात्मा आहे, तिथे विजय असतो – तिथे यश मिळालंच पाहिजे. म्हणून तुम्ही पेशंटना औषधोपचार करायला नकार देऊ शकत नाही.’’

ह्या विधानावरून बाबा हे परमेश्वरच आहेत हे स्पष्ट होते. ते प्रथम म्हणाले, ‘‘जिथे जिथे देव आहे, तिथे यश असतंच. आणि दुसऱ्यांदा म्हणाले, ‘‘तुम्ही पेशंटला दाखल करून घेण्यासाठी नकार देऊ शकत नाही.’’ ह्या दोन्ही विधानांवरून भगवान बाबा हे परमेश्वरच आहेत हे  स्पष्ट होते.

***